ePaper
भाजपा, शिवसेना आणि मनसे मुंबई महापालिका एकत्र लढणार का?



| वर्ष - 6 | अंक - 145 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)



www.mahaenews.com | शनिवार | दिनांक 3 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# चांदणी चौकातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी उपाययोजनांना गती द्या!

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी : राष्ट्रीय महामार्गांच्या कामांची आढावा बैठक संपन्न

**पुणे।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पुणे शहरातील चांदणी चौकातील वाहतूक कोंडीवर उपाययोजना करून नागरिकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने अस्तित्वातील पूल पाडून नवीन बहुमजली उड्डाणपूल बांधण्याचे काम गतीने व्हावे यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करा, अशा सूचना केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिल्या. जे. डब्ल्यू. मॅरियट हॉटेल येथे पुणे जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गांच्या कामांचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार माधुरी मिसाळ, राहुल कुल, विभागीय आयुक्त सौरभ राव आदी उपस्थित होते.

श्री. गडकरी म्हणाले, पुणे-बेंगळुरू महामार्गावरील पुणे शहरातील चांदणी चौकातील वाहतूक कोंडीवर उपाययोजनेसाठी अस्तित्वातील पूल पाडून हा रस्ता सहापदरी करणे तसेच सेवा रस्त्याच्या कामाला गती द्यावी. सेवा रस्त्यासाठीच्या भूसंपादनातील अडथळ्यावंर मार्ग काढून तातडीने जमीन संपादनाचे आदेश (अवॉर्ड) जारी करावेत. भूसंपादनातील अडथळे दूर करण्यासाठी वरीष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांची समिती करावी. जुन्या पुलाच्या तोडकामानंतरच्या राडारोड्याचा उपयोग शहरातीलच विविध प्रकल्पांच्या भरावांसाठी करावा, असेही ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले, प्रस्तावित नवीन पुलाचे बांधकाम गतीने व्हावे यासाठी बांधकाम क्षेत्रातील अत्याधुनिक



तंत्रज्ञानाचे पर्याय तपासून योग्य तंत्रज्ञानाची मदत घ्यावी. नवीन पूल जून २०२३ पूर्वी पूर्ण होईल असे नियोजन करावे. तोपर्यंत वाहतूक सुरळीत राहण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. यापुढे शहरातून जाणाऱ्या इलेव्हेटेड महामार्गांचा आराखडा करताना बहुमजली पूल करावेत. कोणतेही पूल, रस्त्यांचे विस्तृत प्रकल्प अहवाल (डीपीआर) करताना पुढील २५ वर्षांचे नियोजन करावे, असेही श्री. गडकरी म्हणाले.

यावेळी श्री. गडकरी यांनी विविध राष्ट्रीय महामार्गांच्या कामांबाबत सद्यस्थितीचा आढावा घेऊन निर्देश दिले. यामध्ये पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ अंतर्गत देहूरोड ते सातारा रस्त्यावरील वाहतूक कोंडी व अपघातांवर उपाययोजनांसाठी अतिरिक्त कामांसाठी प्रकल्प अहवाल तयार करणे, पुणे सोलापूर रा. मा. क्र. ६५ च्या हडपसर ते यवत या भागातील वाहतूक कोंडी व अपघात होणाऱ्या ठिकाणी उपाययोजनांसाठी इलेव्हेटेड महामार्ग करण्याचे नियोजन, नाशिक फाटा ते खेड रा. मा. क्र. ६०, संत तुकाराम महाराज पालखी मार्ग, संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग आदी कामांचा आढावा घेण्यात आला. राष्ट्रीय महामार्गांच्या कामांसाठी जमीन उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य शासनाने विविध पर्याय द्यावेत, असे श्री. गडकरी यावेळी म्हणाले.

### बैठकीला यांची होती प्रामुख्याने उपस्थिती...

यावेळी एनएचएआयचे मुंबई प्रादेशिक अधिकारी अंशुमली श्रीवास्तव यांनी महामार्गांच्या कामांच्या सद्यस्थिती व नियोजनाबाबत सादरीकरण केले. बैठकीस पुणे महानगर पालिका आयुक्त विक्रम कुमार, पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, पीएमआरडीचे महानगर आयुक्त राहुल रंजन महिवाल, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, पिंपरी- चिंचवड मनपा आयुक्त शेखर सिंग, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, पुण्याचे माजी महापौर मुरलीधर मोहोळ, एनएचएआयचे महाराष्ट्र राज्य प्रादेशिक अधिकारी राजीव श्रीवास्तव, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे मुख्य अभियंता राजेश पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, सार्वजनिक बांधकाम विभाग- राष्ट्रीय महामार्गचे मुख्य अभियंता संतोष शेलार, पोलीस सह आयुक्त संजय शिंदे आदी उपस्थित होते.

# मी पुण्याचा पालकमंत्री होणार नाही अन् लोकसभाही लढणार नाही : फडणवीस

## राज्य मंत्रीमंडळाचा विस्तार लवकरच होईल

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

मी पुण्याचा पालकमंत्री होणार नाही आणि पुण्यातून लोकसभेच निवडणूकही लढवणार नाही, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. फडणवीस हे पुण्यात इलेक्ट्रीक बसच्या चार्जिंग स्टेशनच्या उदघाटनाच्या कार्यक्रमासाठी आले होते. त्यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी वरील घोषणा केली. नवे सरकार आल्यापासून



देवेंद्र फडणवीस हे पुण्याचे पालकमंत्री होणार असल्याची चर्चा रंगली होती. तसेच, ब्राह्मण महासंघाने देवेंद्र फडणवीस यांना पुण्यातून लोकसभेचे तिकिट द्या, अशा मागणीचे पत्र भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांना पाठविले होते. त्यामुळे फडणवीस पालकमंत्री होणार आणि लोकसभा निवडणूक लढविणार, याबाबत चर्चा रंगली होती. त्याला खुद्द फडणवीस यांनीच पूर्णविराम दिला आहे.

माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या भेटीबाबत फडणवीस यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले की, अशोक चव्हाण यांच्याशी माझी भेट झालेली नाही. एका ठिकाणी गणपतीच्या दर्शनासाठी मी पोहोचलो होतो. नेमके त्याचवेळी तेही पोहोचले. मात्र, त्यांची आणि माझी कुठेही भेट झालेली नाही. पुण्याचे दोन भाग होणार, हा नवीन वाद कशाला

काढता आहात. जेव्हा करायचे आहे, तेव्हा बघू. राज्य सरकारपुढे आज तरी पुण्याबाबत असा कुठलाही प्रस्ताव नाही. भविष्यात असा प्रस्ताव येऊ शकतो. मात्र, आज कुठलाही प्रस्ताव राज्य सरकारकडे नाही. मुंबईची तिसरी महानगरपालिका करण्याचा देखील कुठलाही विचार सध्या नाही. नवनवीन वादाचे विषय काढू नका. आपल्याला विकासाकडे जायचं आहे, असे फडणवीसांनी या वेळी निक्षून सांगितले.

### तुम्हाला मी महाराष्ट्रात नको आहे काय? : फडणवीस

फडणवीस म्हणाले की, तुम्हाला मी महाराष्ट्रात नको आहे काय? मी पुण्याचा पालकमंत्री होणार नाही आणि पुण्याची लोकसभाही लढवणार नाही. त्या फक्त माध्यमातील चर्चा आहेत. पक्षात त्याबाबत कसलीही चर्चा नाही. राज्य मंत्रीमंडळाचा विस्तार लवकरच होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. मात्र, काँग्रेसच्या माजी मंत्र्यांची विद्यमान मंत्री मंडळात वर्णी लागणार का, या प्रश्नावर मात्र फडणवीस यांनी मौन बाळगणे पसंत केले.

# वाहतूक कोंडीतून नागरिकांची मुक्तता करणे हा शासनाचा संकल्प : मुख्यमंत्री शिंदे

## पुणे स्टेशन ई-बस डेपो उद्घाटन, पुणे महानगर परिवहन महामंडळाला फेम 2 अंतर्गत प्राप्त 90 ई-बसेसचा लोकार्पण सोहळा

पुणे । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

शहरातील वाहतूक कोंडीतून नागरिकांची (PUNE E-BUS DEPOT) मुक्तता करण्याचा शासनाचा संकल्प आहे. त्यासाठी उड्डाणपूलांची रखडलेली कामे, मेट्रो विस्ताराच्या कामांना गती, चांगले रस्ते उपलब्ध करून देणे यासोबतच सार्वजनिक बससेवेत सुधारणा करणे यावर शासनाचा भर असणार आहे. त्याद्दष्टीने फेम २ अंतर्गत ई-बसची सुविधा महत्वाची ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.पुणे स्टेशन ई-बस डेपो उद्घाटन आणि पुणे महानगर परिवहन महामंडळाला फेम 2 अंतर्गत प्राप्त 90 ई-बसेसच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाला केंद्रीय अवजड उद्योगमंत्री डॉ. महेंद्रनाथ पांडे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विभागीय आयुक्त सौरभ राव, पुणे महानगर परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक लक्ष्मीनारायण मिश्रा आदी उपस्थित होते. शिंदे म्हणाले, ई-बसच्या वापरामुळे प्रवाशांना आरामदायी वाहतूक सेवा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे या बससेचे नागरिकांकडून स्वागत होईल. पुणे उद्योग आणि विद्येचे माहेरघर आहे. सांस्कृतिक शहर आणि एक महानगर म्हणून पुण्याचा विस्तार होत आहे. त्याद्दष्टीने सार्वजनिक वाहतूक मजबूत होणे आवश्यक आहे. त्याद्दष्टीने पीएमपीएमएलची बससेवा महत्वाची ठरणार आहे.

### प्रदूषण विरहीत वाहतूकीसाठी ई-बससेवा महत्वाची

सार्वजनिक वाहतूक सुविधा प्रदूषण विरहीत होण्यासाठी ही बससेवा महत्वाची आहे. पीएमआरडीए क्षेत्रात सार्वजनिक वाहतूक उपयुक्त ठरली आहे. पुणे शहर, पिंपरी चिंचवड सोबत महानगरात समाविष्ट झालेली गावे आणि इतरही ग्रामीण भागातील गावांमध्ये पीएमपीएमएलची बससेवा पोहोचली आहे.

महानगरातील वाहतूक कोंडी ही येत्या काळातील मोठी समस्या होणार आहे. त्यामुळे वाहतूक व्यवस्था सक्षम आणि सुविधाजनक करणे हा त्यावरचा प्रभावी उपाय ठरू शकेल. त्यासाठी येत्या काळात ई-बससेवेचा विस्तार करण्यावर भर देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. राज्यातील विविध प्रकल्पांना शासन गती देत असल्याचे शिंदे म्हणाले. पीएमपीएमएलच्या कर्मचाऱ्यांना 7 व्या वेतन आयोगाचा लाभ देण्याबाबत बैठकीचे आयोजन करण्याचे निर्देश त्यांनी दिले.



### हरित ऊर्जा उपयोगाच्या क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसर – केंद्रीय मंत्री डॉ.महेंद्रनाथ पांडे

ई-बस सेवा सुरू करण्यासाठी पीएमपीएमएलचे अभिनंदन करून डॉ.पांडे म्हणाले, फेम २ अंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानाचा उद्देश हरित ऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन देत कार्बन उत्सर्जन कमी करणे आहे. यामुळे विकसीत देश म्हणून ओळख होण्यास मदत होणार आहे. प्रदूषण कमी करून नागरिकांचे आरोग्य चांगले रहाण्यासाठी ही सुविधा महत्वाची आहे. पुणे शहराने ई-मोबॅलिटीच्या दिशेने सर्वात पहिले पाऊल उचलले ही गौरवास्पद बाब आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'पंचामृत' संकल्पनेअंतर्गत देशात २०३० पर्यंत कार्बन उत्सर्जन करण्याच्या उपययोजनांवर भर दिला आहे.

देशातील अर्थव्यवस्थेतही कार्बनवरील अवलंबित्व कमी करण्यावर भर देण्यात येत आहे. देशाला हरित ऊर्जेच्या दृष्टीने समर्थ करण्यासाठी आणि आर्थिक समृद्धीच्या दिशेने हे महत्वाचे पाऊल ठरेल. हे उद्दीष्ट गाठण्यात महाराष्ट्राचे महत्वाचे योगदान आहे. ऑटो उद्योगातही याद्दष्टीने सुधारणा करण्यासाठी अनुदान देण्यात येत आहे. या क्षेत्रातील उद्योजकांचा प्रतिसादही उत्साहवर्धक आहे. देशात कोरोना नंतरच्या काळात या क्षेत्रात 75 हजार कोटींची नवी गुंतवणूक झाली आहे. इलेक्ट्रीक बॅटरीच्या क्षेत्रात चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले.

मान्यवरांच्या हस्ते पुणे स्टेशन ई-बस डेपोचे उद्घाटन आणि ई-बसेसचे लोकार्पण करण्यात आले. आमदार सुनिल कांबळे यांच्या आमदार स्थानिक विकास निधी अंतर्गत करण्यात आलेल्या पुणे स्टेशन बस डेपो येथे पीएमपीएमएलच्या कर्मचाऱ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या प्रतिक्षालय इमारतीचे उद्घाटनही यावेळी करण्यात आले.

### सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत अमूलाग्र बदल घडवू – उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुणे शहरासाठी येत्या काळात मेट्रोचा विस्तार करून एकात्मिक वाहतूक व्यवस्था उभारण्यात येईल. यासाठी विविध प्रकारच्या ॲपचे आणि ई-प्लॅटफॉर्मचे एकत्रिकरण करून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा प्रभावी वापर निश्चित करण्यात येईल. ई-बससेवेच्या माध्यमातून महाराष्ट्र सरकार सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत अमूलाग्र बदल घडवून आणेल.

पीएमपीएमएल देशातील अग्रणी प्रकारची अपारंपरिक ऊर्जेवर चालणारी सेवा म्हणून नावारुपास येणार आहे. ही बससेवा पुणेकरांच्या पसंतीस पडली आहे. या बसेसनी 2 कोटी किलोमीटर वाहतूकीचा टप्पा पूर्ण केला आहे. केंद्र सरकारने फेम 2 अंतर्गत ई-बसेससाठी मोठी सबसिडी दिल्याने लोकांवर अतिरिक्त बोजा पडला नाही. येत्या काळात अपारंपरिक ऊर्जेवर चालणारी आणि शून्य कार्बन उत्सर्जन करणारी ही देशातील पहिली बससेवा ठरेल. राज्यातील पूर्ण सार्वजनिक वाहतूक सुविधा (PUNE E-BUS DEPOT) पर्यायी इंधनाच्या सहाय्याने चालविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. त्याद्दष्टीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात प्रयत्न करण्यात येत आहेत. पीएमपीएमएलने सर्व चार्जिंग स्टेशन सौर ऊर्जेवर रुपांतरीत करावे आणि शून्य कार्बन उत्सर्जनाचे ध्येय गाठण्याच्या दिशेने प्रयत्न करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# जुन्या सांगवीतील अरविंद एज्युकेशनच्या विद्यार्थ्यांकडून गणपती मंडळांसमोर 'पथनाट्याद्वारे जनजागृती'

## स्वच्छता, पर्यावरणाकडे विद्यार्थी वेधत आहेत नागरिकांचे लक्ष

पुणे । ।महाईन्यूज ।गणेश क्षिरसागर।

जुन्या सांगवीतील अरविंद एज्युकेशन सोसायटी प्रशालेने गणेशोत्सवात स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. प्रशालेचे विद्यार्थी सांगवीतील सर्व गणेशोत्सव मंडळांसमोर पथनाट्ये सादर करीत सामाजिक समस्यांकडे नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत. विद्यार्थी-विद्यार्थिनी सादर करीत असलेल्या पथनाट्यांना गणेश भक्तांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



जुनी सांगवीतील अरविंद एज्युकेशन सोसायटीचे लिटल फ्लॉवर इंग्लिश/मराठी मीडियम स्कुल, भारतीय विद्यानिकेतन विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये दरवर्षी गणेशोत्सवात वैविध्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. यंदा विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर पथनाट्ये बसविली असून, ही पथनाट्ये सांगवी परिसरातील प्रत्येक गणपती मंडळासमोर सादर केली जात आहेत.

पर्यावरण, स्वच्छता, ग्लोबल वॉर्मिंग, सामाजिक सुरक्षितता अशा विविध विषयांवर दररोज सायंकाळी गणपती मंडळांसमोर विद्यार्थी-विद्यार्थिनी पथनाट्ये सादर करीत आहेत. विद्यार्थ्यांनी स्वच्छतेवर आधारित पथनाट्य सादर करून या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. नागरिकांचे मनपरिवर्तन करणे गरजेचे आहे, हेच विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून दाखवून दिले आहे. विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकवृंद, कर्मचारीही मोहिमेत सहभागी होत आहेत.

याबाबत संस्थेच्या अध्यक्षा आरती राव यांनी सांगितले की, आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो, या उद्देशाने पथनाट्याच्या माध्यमातून समाजमन बदलण्याचा प्रयत्न विद्यार्थी करीत आहेत. संस्थेचे सचिव प्रणव राव यांनी सांगितले, की आज समाज प्रबोधनाची अनेक साधने उपलब्ध असली, तरी पथनाट्यांच्या माध्यमातून प्रभावी जनजागृती होत असल्याचे दिसते. नाट्य प्रशिक्षक श्रावण डाखोळे यांनी विद्यार्थ्यांकडून पथनाट्ये बसवून घेतली आहेत. तर शिक्षिका स्वाती गाडे, नीलम मेमाणे, अमृता अमोलिक यांनी साहाय्य केले आहे. तसेच गणपती मंडळांजवळील नियोजन भटू शिंदे आणि उदय फडतरे करीत आहेत.

# भोसरी महोत्सव शहराच्या सांस्कृतिक क्षेत्राचा मानबिंदू!

## आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला विश्वास...

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

भोसरी कला, क्रीडा मंचच्यावतीने आयोजित केलेला भोसरी महोत्सव हा पिंपरी चिंचवड शहरातील सांस्कृतिक क्षेत्राचा मानबिंदू ठरला आहे. देशभर मोठ्या उत्साहाने साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवाला मोठा प्रबोधनाचा, संस्कृतीचा वारसा लाभला आहे. तो वारसा जपण्याचे व वृद्धिंगत करण्याचे काम पुढील काळात या मंच माध्यमातून होईल असा विश्वास आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला.



भोसरी कला, क्रीडा मंचच्या वतीने आयोजित केलेल्या "भोसरी महोत्सव २०२२" चे उद्घाटन गुरुवारी आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते करण्यात आले. भोसरीतील कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृह येथे झालेल्या उद्घाटन समारंभात अध्यक्ष माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, माजी खासदार अमर साबळे, ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, अभिनेत्री निर्मिती सावंत, संयोजक व स्थायी समितीचे माजी अध्यक्ष ॲड. नितीन लांडगे, ज्येष्ठ माजी नगरसेवक वसंत नाना लोंढे, जेष्ठ नेते बाळासाहेब गव्हाणे, माजी नगरसेवक राजेंद्र लांडगे, मोरेश्वर शेडगे, माजी नगरसेविका सुनंदाताई फुगे, सारिका लांडगे, सोनाली गव्हाणे, संयोजन समितीचे विजय फुगे, भरत लांडगे सुनील लांडगे किशोर गव्हाणे, निवृत्ती फुगे, राजेंद्र सोनवणे, संजय बेंडे, नंदू लोंढे, श्याम लांडगे,भानुदास फुगे, लक्ष्मण काचोळे आदी उपस्थित होते. माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील शुभेच्छा देताना म्हणाले की, भोसरी गावाला इतिहासकालीन संस्कृतीचा वारसा आहे. तसेच शेती, पहिलवान, गावजत्रा, बैलगाडा शर्यती बरोबरच आता वेगाने विस्तारणाऱ्या उद्योग, व्यापार, कामगार क्षेत्रामुळे भोसरीचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचले आहे. आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वाखाली ॲड. नितीन लांडगे आणि विजय फुगे तसेच त्यांचे सर्व सहकारी भोसरी कला, क्रीडा मंचच्या माध्यमातून याचा नावलौकिक आणखी वाढवतील.

### चित्रकार नंदू लोंढे यांच्या फोटोंच्या प्रदर्शनाचे उद्घाटन

माजी खासदार अमर साबळे यांनी सांगितले की, संयोजकांनी समय सूचकता पाळून या महोत्सवात आयोजित केलेल्या कार्यक्रमामुळे उपस्थित नागरिकांना आनंद आणि सुख मिळणार आहे. स्वागत, प्रास्ताविक करताना ॲड. नितीन लांडगे यांनी सांगितले की, सतरा वर्षापासून भोसरी महोत्सव आयोजित करण्यात येत आहे. येथील नागरिकांना आपल्या व्यस्त कामातून विरंगुळा मिळावा. मनोरंजनातून प्रबोधन व्हावे. स्थानिक कलाकारांना सक्षम व्यासपीठ मिळावे या उद्देशाने स्थानिक सहकाऱ्यांना बरोबर घेऊन हे मंचची स्थापना करण्यात आली. छाया चित्रकार नंदू लोंढे यांच्या फोटोंच्या प्रदर्शनाचे उद्घाटन ही करण्यात आले. सूत्र संचालन प्रा. दिगंबर ढोकले तर आभार विजय फुगे यांनी मानले.

---

### पिंपळेगुरव मधील अनंतनगर तरुण मित्र मंडळ साजरे करतेय 'सुवर्ण महोत्सवी वर्ष'

पिंपरी । पिंपळेगुरव मधील अनंतनगर तरुण मित्र मंडळ यंदा सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करत असून, यानिमित्त मंडळाने स्वराज्य महाल हा भव्य देखावा साकारला आहे. मंडळाची स्थापना 1972 साली झाली आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त मंडळाने बाल जत्रा, रक्तदान शिबिर, होम मिनिस्टर, निवृत्ती महाराज देशमुख यांचे कीर्तन आधी कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. या गणपती मंडळाची विसर्जन मिरवणूकही डोळ्याचे पारणे फेडणारी असते. मंडळाने कोरोना काळात गोरगरिबांना अन्नधान्य वाटप, पूरग्रस्तांना मदत, रक्तदान शिबिरांचे आयोजन, अनाथ आश्रमांना अन्नधान्य स्वरूपात मदत, वृद्धाश्रमांना मदतीचा हात, नागरिकांच्या सेवेसाठी वाचनालय, वारकऱ्यांची सेवा, आदी विविध कार्यक्रम घेतले आहेत. या व्यतिरिक्त मंडळ समाज प्रबोधन करणारे, तसेच विविध सांस्कृतिक व ऐतिहासिक देखावे सादर करीत असते, जेणेकरून समाजप्रबोधन होईल.

याबरोबरच विविध समाजसुधारक व महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथीचे कार्यक्रम घेते. तसेच बालकांसाठी दिवाळीमध्ये किल्ले बनवा स्पर्धा आयोजित करते.

## कळंब आणि मावळ येथील गावामध्ये जनावरामध्ये लंम्पी आजाराचे प्रमाण वाढले

### जनावरांची खरेदी विक्री, तसेच गणेशोत्सवानिमित्त आयोजित बैलगाडा शर्यती रद्द

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील कळंब आणि मावळ येथील उर्से या गावामध्ये जनावरामध्ये लंम्पी आजाराचे प्रमाण वाढलेले आहे. या संसर्गजन्य आजारामुळे कमी कालावधीत अधिक जनावरांना याची लागण झाली आहे. त्यामुळे पशुसंवर्धन विभागाच्या वतीने जनावरांच्या संसर्ग केंद्रापासून निगराणी म्हणून या भागापासून दहा किलोमीटर बाधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. दरम्यान जनावरांना झालेला संसर्ग लक्षात येथील जनावरांची खरेदी विक्री, तसेच गणेशोत्सवानिमित्त आयोजित बैलगाडा शर्यती रद्द करण्यात आल्या आहेत.

पुणे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत याबाबत आदेश जारी करण्यात आले आहेत. याबाबत आंबेगाव तालुक्याच्या तहसीलदार तथा तालुका आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अध्यक्ष रमा जोशी यांनी सूचित केले आहे. त्यांनी दिलेल्या आदेशात म्हटले आहे की, पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील कळंब आणि मावळ येथील उर्से या गावामध्ये जनावरामध्ये लंम्पी आजाराचे प्रमाण वाढलेले आहे.

या संसर्गजन्य आजारामुळे कमी कालावधीत अधिक जनावरांना याची लागण झाली आहे. त्यामुळे पशुसंवर्धन विभागाच्या वतीने जनावरांच्या संसर्ग केंद्रापासून निगराणी म्हणून या भागापासून दहा किलोमीटर बाधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यामुळे सदर गावापासून १० कि.मी. परिघातील क्षेत्रामध्ये बाधित व निगराणी क्षेत्रामध्ये जनावरांची खरेदी / विक्री, वाहतुक, बाजार, जत्रा व प्रदर्शन बैलांच्या शर्यती आयोजित करण्यास पुढील आदेश होईपर्यंत प्रतिबंध घातलेले आहेत.

### दुध उत्पादनाला फटका

लंम्पी हा जनावरांना होणारा त्वचा रोग असून तो संसर्गजन्य आहे. त्यामुळे त्याचा फैलाव मोठ्या प्रमाणात होत असतो. यात जनावरांच्या अंगावर मोठ्या आणि छोट्या गाठी उठत असतात .त्यामुळे गुरे अशक्त होत असतात. त्याचा फटका जिल्ह्यात दुध उत्पादनाला बसतो.

## संपादकीय »

# उत्तुंग भरारीची पूर्वतयारी

***चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतील विकासदराचे आकडे सुखावणारे आहेत. एप्रिल ते जून या पहिल्या तिमाहीत विकासदराने १३.५ अशी पातळी गाठली आहे.***

पहिल्या तिमाहीतील विकासाचा वेग हा नेहमीच पुढच्या तीन तिमाहींमध्ये वाढत जातो. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, भारतात दुसऱ्या तिमाहीत सण व उत्सवांना आरंभ होतो. तो पुढे दीर्घ काळ टिकतो. तो जसा आनंद व उत्साहाचा कालावधी असतो; तसाच अर्थवाढीचाही असतो.

तिसऱ्या तिमाहीच्या आरंभी खरीप पिकेही हाती आलेली असतात. यंदा देशभरातील पावसाचे प्रमाण पाहता खरिपाचे पीकही उत्तम येईल, असे दिसते. थोडक्यात, पहिल्या तिमाहीत झालेला हा उत्तम आरंभ पुढेही कायम राहण्याची शक्यता आहे. या वाढीचा एक ठोस पुरावा म्हणजे, ऑगस्ट महिन्यात वस्तू आणि सेवा कराचे (जीएसटी) संकलन तब्बल एक लाख ४३ हजार कोटी रुपयांवर गेले आहे. हाही विक्रमच आहे. भारतीय अर्थव्यवस्थेने करोनाचे मानसिक आणि प्रत्यक्षातले जोखड आता पुरते फेकून दिले असून, तिचे 'ॲनिमल स्पिरिट' म्हणजे वाढीची अंगभूत आकांक्षा जागी झालेली दिसते. करोनाकाळात अर्थवाढीला फटका बसल्याने बेरोजगारी; तसेच गरिबीच्या रेषेखाली गेलेल्या कुटुंबांची संख्या वाढली होती. आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत बेरोजगारीचा दर ७.६ टक्के झाला आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत हा दर १२.६ टक्के होता. तो प्रत्येक तिमाहीत क्रमाक्रमाने कमी होत गेला आहे. ही समाधानाची बाब आहे. जगभरात रोजगारविहीन अर्थवृद्धी हे एक संकट असते. यांत्रिकीकरण किंवा रोबोंच्या वापरांमुळे आर्थिक विकास तर होत राहतो; पण रोजगार वाढत नाहीत. भारतात सध्या तरी तसे होताना दिसत नाही. अर्थातच, सध्याचाही बेरोजगारीचा दर बराच जास्त आहे. तो पुढच्या काळात आणखी कमी होण्याची आवश्यकता आहे.बेरोजगारीचा दर कमी होण्याचे एक कारण म्हणजे, सेवाक्षेत्रात सातत्याने होत असणारी वाढ. सेवाक्षेत्रात या तिमाहीत १७ टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. सेवाक्षेत्रातील वाढ ही अर्थव्यवस्थेचा पाया भक्कम करतेच असे नाही. ही वाढ अनेकदा अस्थिरही असते. कृषी क्षेत्र; तसेच उत्पादन क्षेत्रातील वाढ ही अधिक महत्त्वाची आणि अर्थकारणाला स्थिरता देणारी असते. कृषी क्षेत्राची वाढ आत्ता केवळ साडेचार टक्के आहे. दुसऱ्या आणि तिसऱ्या तिमाहीचे आकडे बाहेर येतील, तेव्हा हा आकडा वाढलेला असू शकतो. करोनाच्या दुसऱ्या लाटेनंतर भारताची अर्थव्यवस्था नेमकी कधी ताळ्यावर येणार, याविषयी साऱ्या जगात चिंता होती.



## आनंदी सकाळ

### चंचल मन : दोष व गुण

आपला देह हा पंचभूतात्मक आहे, म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश ही तत्त्वरूपाने असतात. वाहणारा वायू हा जडस्वरूप वायू आहे; मात्र तत्त्वरूपातील वायू किंवा पाणी हे यापेक्षा वेगळे आहे. मन हे वायू तत्त्वापासून, बुद्धी हे तेज, चित्त आकाश, तर अहंकार हा पृथ्वी तत्त्वापासून म्हणजे जडतत्त्वापासून बनला आहे. यातील मन चंचल आहे. ते भटकते. हा त्याचा दोष; पण जेथे दोष असतात, तेथे काही गुणही असतात. जसे चिकटणे हा हिंगाचा दोष असला, तरी तो योग्य पद्धतीने सेवन केल्यास तो जठररोग दुरुस्त करतो; तसेच चंचलता हा मनाचा दोष असला, तरी परमार्थाच्या दृष्टीने तोही उपयुक्त आहे. मन स्थिर असते, तर जीवनात घडलेली एखादी दु:खद घटना आपण मरेपर्यंत विसरलो नसतो. मन चंचल असल्यामुळे आपण जुने विसरून नव्या उभारीने जीवन सुरू करतो. ही नवी उभारी या चंचल मनामुळे येते, म्हणून चंचलता हा दोष व गुण असे दोन्ही आहे. या चंचल मनाला आवर घातल्यावर परमार्थात प्रगती होते.

# परवडणारे शिक्षण देण्याच्या बाता मारणारे सरकार का वाढवत आहे शिक्षणावरील कर






पाठ्यपुस्तकांवर जीएसटी नसला, तरी कागद, छपाई, बांधणी यांवर तो आहे. छपाई, शाई, चित्रकलेचे साहित्य, पेन्सिल, ब्लेड, शार्पनर यांवर आता १८ टक्के जीएसटी आकारणी होईल. नकाशे, तक्ते, पृथ्वीचा गोल यांवरही कर असेल. परवडणारे शिक्षण देण्याच्या बाता मारणारे सरकार प्रत्यक्षात शिक्षण महाग करीत आहे. पाठ्यपुस्तकांवर जीएसटी नसला, तरी कागद, छपाई, बांधणी यांवर तो आहे. छपाई, शाई, चित्रकलेचे साहित्य, पेन्सिल, ब्लेड, शार्पनर यांवर आता १८ टक्के जीएसटी आकारणी होईल. नकाशे, तक्ते, पृथ्वीचा गोल यांवरही कर असेल. परवडणारे शिक्षण देण्याच्या बाता मारणारे सरकार प्रत्यक्षात शिक्षण महाग करीत आहे. केंद्र सरकारने मोठा गाजावाजा करीत 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'चा (एनईपी) स्वीकार केला असून, त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. परवडणारे शिक्षण, समता, सोय, गुणवत्ता व उत्तरदायित्व असे पाच स्तंभ या धोरणात नमूद करण्यात आले आहेत. एकीकडे उपेक्षित घटकाच्या शिक्षणाबद्दलच्या आकांक्षा वाढत आहेत, तर दुसरीकडे शिक्षण प्रचंड महाग होत आहे. या कात्रीत बहुसंख्य पालक अडकले आहेत. परवडणाऱ्या शिक्षणाचा उल्लेख धोरणात झाला असला, तरी ते प्रत्यक्षात आणण्याबाबत सरकार उदासीन आहे; किंबहुना ते त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. शैक्षणिक साहित्यांवर वस्तू आणि सेवाकर (जीएसटी) आकारण्याचा सरकारचा निर्णय हीच बाब अधोरेखित करते.

देशातील गेल्या सात दशकांतील सार्वजनिक व खासगी क्षेत्रांकडून शिक्षणावर होत असलेल्या खर्चाविषयी हैदराबाद येथील 'सेंटर फॉर इकॉनॉमिक्स अँड सोशल स्टडीज ' या संस्थेने केलेल्या अभ्यासाचे निष्कर्ष डोळे उघडणारे आहेत. १९५१-५२मध्ये देशात शिक्षणावरील सार्वजनिक खर्च ६५ कोटी रुपये होता; २०१९-२०मध्ये आठ लाख ४९ हजार २७९ कोटी रुपये झाला आहे.

याच काळात शिक्षणावरचा खासगी खर्च ८६ कोटी रुपयांवरून पाच लाख १४ हजार ७६३ कोटी रुपये झाला आहे. याचा अर्थ असा, की गेल्या सत्तर वर्षांत शिक्षणावरील सार्वजनिक खर्चात दर वर्षी १४ टक्क्यांनी वाढ झाली, तर खासगी खर्चात १३ टक्क्यांनी वाढ झाली. १९५१-५२मध्ये शिक्षणासाठीचा दरडोई खर्च १.८ रुपये होता; २०१९-२०मध्ये तो ६३३७ रुपये झाला. याच काळात खासगी शिक्षणासाठीचा दरडोई खर्च २.४ रुपयांवरून ३८४२ रुपये झाला. या दोन्ही खर्चांमधील दर वर्षीची वाढ अनुक्रमे १२ आणि ११ टक्के आहे.सन १९५१-५२ ते १९९१-९२ या पहिल्या चार दशकांत शिक्षणावरचा सार्वजनिक खर्च हा खासगी खर्चापेक्षा जास्त गतीने वाढत होता.

# कुपोषण : प्रश्न आणि उत्तर

**कुपोषण, माता-बाल मृत्यू हे मुद्दे नवे नाहीत. त्याविषयी अनेकदा चर्चा होत असते. आदिवासी भागातील कुपोषण आणि माता-बाल मृत्यू या प्रश्नांवर मार्ग काढण्यासाठी काही लगेच करण्याचे आणि काही दीर्घकालीन उपाय हवेत.**

त्यासाठी सर्वसमावेशक उपचार प्रणाली आणि योजनांचे एकत्रिकरण हवे. हे जेवढ्या लवकर आणि प्रभावीपणे होईल, तितक्या लवकर या प्रश्नावर मार्ग निघेल. कालांतराने हे प्रश्न सतावणार नाहीत.

कुपोषण, माता-बाल मृत्यू हे मुद्दे नवे नाहीत. त्याविषयी अनेकदा चर्चा होत असते. आदिवासी भागातील कुपोषण आणि माता-बाल मृत्यू या प्रश्नांवर मार्ग काढण्यासाठी काही लगेच करण्याचे आणि काही दीर्घकालीन उपाय हवेत. त्यासाठी सर्वसमावेशक उपचार प्रणाली आणि योजनांचे एकत्रिकरण हवे. हे जेवढ्या लवकर आणि प्रभावीपणे होईल, तितक्या लवकर या प्रश्नावर मार्ग निघेल. कालांतराने हे प्रश्न सतावणार नाहीत.

विधानसभेत पुन्हा एकदा कुपोषण गाजले, विरोधक मंत्र्यांवर तुटून पडले. कुपोषण का होते, याची कारणमीमांसा अनेकदा झाली आहे. कुपोषणाच्या कारणामध्ये अनेक कंगोरे आहेत.



सामाजिक, आर्थिक, रूढी-परंपरा, वैद्यकीय सोयी-सुविधा, शिक्षण, भौगोलिक रचना, अंधविश्वास, दळणवळणाची साधने, संपर्क यंत्रणा अशा अनेक गोष्टी त्यासाठी जबाबदार असतात. आपले मूल जगलेच पाहिजे, या निर्धाराने बालकाच्या आई-वडिलांनी उभे राहिले पाहिजे, आदिवासी पालकांना पावसात काम मिळाले पाहिजे, सरकारच्या खावटीवर अवलंबून राहावे लागता कामा नये. आज केंद्र व राज्य सरकारच्या अनेक योजना आहेत. आरोग्य खाते, महिला व बालविकास, आदिवासी विभाग, ग्रामविकास, अन्न, नागरी पुरवठा, रोजगार हमी, सामाजिक न्याय यांच्या योजना एकत्रितपणे राबवल्या, 'कन्व्हर्जन ऑफ स्कीम' केले, तर निश्चित कुपोषण कमी होईल. अर्भक मृत्यू, बाल मृत्यू कमी होतील. वाडा, मोखाडा, खोडाळा, डोळखांब, शहापूर, पेठ सुरगणा, अक्कल कुवा, धडगाव, मेळघाट, अकोले या भागातील कुपोषण भौगोलिक रचनेनुसार आहे. सह्याद्रीच्या पाड्यावरची राहणी वेगळी, चालीरिती, रूढी वेगळ्या. सातपुडा जंगलातील वेगळ्या, तर थंड हवेचे ठिकाण असलेल्या चिखलदरा, धारणी येथील राहणीमान वेगळे. गडचिरोलीचा भाग वेगळा. कोरकू, भिल्ल, वारली, गोंड, कातकरी असे वेगवेगळ्या जमातीचे लोक राहतात. लवकर लग्न आणि लवकर गर्भधारणा हे कारण आहेच. अनेक वर्षांपासून चालत आलेल्या चालीरीती आजही कायम आहेत. या लोकांचा एकलकोंडा स्वभाव, सरकार-पोलिस यांपासून भीती; त्यामुळे जंगलात राहणे मुख्य रस्त्यापासून दूर पाड्यावर राहणे, वेगवेगळ्या वस्ती करून राहिल्याने सोयी-सुविधांपासून ते वंचित आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



एकादशीव्रत सोमवार न करिती ।
कोण त्यांची गति होइल नेणों ॥१॥
काय करूं बहु वाटे तळमळ ।
आंधळीं सकळ बहिर्मुख ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी गाळा क्रमांक 79-80 छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, संत तुकाराम नगर, अग्निशमन केंद्रासमोर, पिंपरी, पुणे - 411018. **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## वाईन शॉप मॅनेजरचा भोसकून खून

**नांदेड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पसंतीची बियर उपलब्ध करून दिली नसल्याच्या कारणावरून वाईन शॉप व्यवस्थापकाचा खंजीरने भोसकून खून केल्याची संतापजनक घटना सिडको येथील ढवळे कॉर्नर येथे गुरूवारी रात्री घडली. या प्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना रात्रीतून ताब्यात घेतले असून उर्वरित तीनही आरोपींना लवकरच अटक केली जाईल, असे ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड यांनी सांगितले.

अत्यंत वर्दळीचा भाग असलेल्या ढवळे कॉर्नर येथे माजी नगरसेवक संदीप चिखलीकर यांचे प्रदीप वाईन शॉप आहे. या वाईन शॉपमध्ये एकूण चौघेजण काम करतात. तेथे माधव वाकोरे हे व्यवस्थापक होते. गुरूवारी रात्री साडेदहा वाजेच्या दरम्यान एक जणाने ट्युबर्ग नावाची बियर देण्याची मागणी तेथील नोकराकडे केली.

# एकनाथ खडसेंचा निर्णय चुकला?

## राष्ट्रवादीत प्रवेश करण्यावरून पंकजा मुंडेंचं मोठं विधान!

**मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**भारतीय जनता पार्टीच्या नेत्या पंकजा मुंडे यांनी नुकतीच एका मराठी वृत्तवाहिनीला मुलाखत दिली आहे. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील सध्याच्या विविध राजकीय घडामोडींवर भाष्य केलं आहे. शिवसेना पक्षात पडलेली फूट, नवीन सरकार, एकनाथ खडसे यांचा राष्ट्रवादीत प्रवेश... अशा विविध प्रश्नांवर पंकजा मुंडे यांनी सडेतोड उत्तरं दिली आहेत. एकनाथ खडसे यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय चुकला का? असा प्रश्न विचारला असता पंकजा मुंडे यांनी मोठं विधान केलं आहे.**

भारतीय जनता पार्टीच्या नेत्या पंकजा मुंडे यांनी नुकतीच एका मराठी वृत्तवाहिनीला मुलाखत दिली आहे. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील सध्याच्या विविध राजकीय घडामोडींवर भाष्य केलं आहे. शिवसेना पक्षात पडलेली फूट, नवीन सरकार, एकनाथ खडसे यांचा राष्ट्रवादीत प्रवेश... अशा विविध प्रश्नांवर पंकजा मुंडे यांनी सडेतोड उत्तरं दिली आहेत.

एकनाथ खडसे यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय चुकला का? असा प्रश्न विचारला असता पंकजा मुंडे यांनी मोठं विधान केलं आहे.

"लोकं परिस्थितीमुळे एखादा निर्णय घेत असतात. त्यामुळे तो निर्णय चुकला की बरोबर आहे? हे लोकं ठरवत असतात. पक्ष सोडून गेल्याबाबत तुम्ही फक्त त्यांचं एकट्याचंच नाव घेतलं, हा त्यांच्यावर अन्याय आहे. अनेक लोकांनी पक्ष बदलले. त्यांची यादी वाचायची असेल तर दोन-तीन तासही पुरणार नाहीत" असं विधान पंकजा मुंडे यांनी केलं आहे.

एकनाथ खडसे यांनी काही दिवसांपूर्वी भाजपाला रामराम ठोकून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्षप्रवेश केला आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांचा पक्षातील काही नेत्यांशी अंतर्गत कलह सुरू होता.

पक्षातील काही नेत्यांकडून त्यांचं खच्चीकरण केलं जातंय, अशा बातम्या समोर येत होत्या. यानंतर अलीकडेच एकनाथ खडसे यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. आता ते राष्ट्रवादीकडून विधान परिषद आमदार आहेत.



**पंकजा मुंडे म्हणाल्या की, "पहिली गोष्ट मी कुणत्याही व्यक्तीबाबत मत बनवत नाही. तसेच कुणाचा निर्णय चुकला किंवा बरोबर आहे? हे सांगण्याएवढी मी परिपक्कं आणि मोठी नाही. दुसरी गोष्ट म्हणजे एखादा निर्णय घेण्यासाठी परिस्थिती भाग पाडत असते. तुमच्या नाका-तोंडात पाणी चाललं असताना, तुम्ही एखाद्या झाडाची फांदी पकडली, तर ती फांदी पकडू नका, असं आपण म्हणू शकत नाही." "लोकं परिस्थितीमुळे एखादा निर्णय घेत असतात. त्यामुळे तो निर्णय चुकला की बरोबर आहे? हे लोकं ठरवत असतात. पक्ष सोडून गेल्याबाबत तुम्ही फक्त त्यांचं एकट्याचंच नाव घेतलं, हा त्यांच्यावर अन्याय आहे. अनेक लोकांनी पक्ष बदलले. त्यांची यादी वाचायची असेल तर दोन-तीन तासही पुरणार नाहीत" असं विधान पंकजा मुंडे यांनी केलं आहे.**

# "रस्त्यावरील शेंबडं पोरगंही..." शिवसेना नेत्या मनीषा कायंदे यांचा राज ठाकरेंवर हल्लाबोल!

**दुधड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

मागील काही दिवसांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह भारतीय जनता पार्टीच्या काही नेत्यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली आहे. राज ठाकरे यांच्या निवासस्थानी भेटीगाठी वाढल्याने महाराष्ट्रात भाजपा-मनसेची युती होईल, अशा चर्चांना उधाण आलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाहदेखील मुंबई दौऱ्यात युतीसंदर्भात बोलणी करण्यासाठी राज ठाकरेंना भेटणार असल्याचंही बोललं जात आहे. या सर्व घटनाक्रमानंतर शिवसेना नेत्या मनीषा कायंदे यांनी राज ठाकरेंवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे सत्तेसाठी लाचारी करत आहेत. त्यांना ज्यांनी शिव्या घातल्या त्यांचीच गळाभेट ते घेत आहेत. त्यांचा हिंदुत्वाचा मुखवटा गळून पडला आहे, अशी टीका कायंदे यांनी केली आहे. त्या मुंबईत एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलत होत्या. मनसे-भाजपा युतीबाबत विचारलं असता कायंदे म्हणाल्या की, "राज ठाकरे यांनी २०१४, २०१९ मध्ये 'लाव रे तो व्हिडीओ' म्हणत भाजपावर सडकून टीका केली होती. आता त्यांनी सत्तेसाठी लाचारी पत्करली आहे. ज्या लोकांनी त्यांना शिव्या घातल्या, त्यांच्याकडे जाऊन ते सत्तेसाठी हातमिळवणी करत आहेत, गळाभेट घेत आहेत. हे सगळं महाराष्ट्र उघड्या डोळ्यांनी पाहतोय. त्यांचा हिंदुत्वाचा मुखवटा गळून पडला आहे. त्यामुळे असली कोण आणि नकली कोण? हेही महाराष्ट्राला कळालं आहे."



मनसे अध्यक्ष राज ठाकरे सत्तेसाठी लाचारी करत आहेत. त्यांना ज्यांनी शिव्या घातल्या त्यांचीच गळाभेट ते घेत आहेत. त्यांचा हिंदुत्वाचा मुखवटा गळून पडला आहे, अशी टीका कायंदे यांनी केली आहे. त्या मुंबईत एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलत होत्या. मनसे- भाजपा युतीबाबत विचारलं असता कायंदे म्हणाल्या की, "राज ठाकरे यांनी २०१४, २०१९ मध्ये 'लाव रे तो व्हिडीओ' म्हणत भाजपावर सडकून टीका केली होती. आता त्यांनी सत्तेसाठी लाचारी पत्करली आहे. ज्या लोकांनी त्यांना शिव्या घातल्या, त्यांच्याकडे जाऊन ते सत्तेसाठी हातमिळवणी करत आहेत, गळाभेट घेत आहेत. हे सगळं महाराष्ट्र उघड्या डोळ्यांनी पाहतोय. त्यांचा हिंदुत्वाचा मुखवटा गळून पडला आहे. त्यामुळे असली कोण आणि नकली कोण? हेही महाराष्ट्राला कळालं आहे."

राज्यातील या घडामोडींमागे भाजपाचा सहभाग आहे का? असं विचारलं असता मनीषा कायदे म्हणाल्या की, "त्यांची स्क्रीप्ट कुठून येतेय? हे सर्वांना दिसत आहे. त्यामुळे आम्ही कशाला यावर बोलून दाखवायचं. रस्त्यावरील शेंबडं पोरगंही ओळखतंय स्क्रीप्ट कुठून येतेय."

भारतीय जनता पार्टीने काश्मीरमध्ये पीडीपीबरोबर सत्ता स्थापन केली, हे त्यांचं हिंदुत्व आहे. ज्या नितीशकुमारांनी सांगितलं की आरएसएसवर बंदी घाला, त्यांच्याबरोबर भाजपानं बिहारमध्ये युती केली, हे त्यांचं हिंदुत्व आहे. भारतीय जनता पार्टीने कुणाबरोबरही युती केली तर ती नैसर्गिक युती असते. पण शिवसेनेनं राष्ट्रवादी आणि काँग्रेससोबत युती केली तर ती अनैसर्गिक युती मानली जाते. हा त्यांचा ढोंगीपणा असून महाराष्ट्र त्यांचा ढोंगीपणा ओळखून आहे, अशी टीकाही कायंदे यांनी यावेळी केली.

# "आता राजा पेटीतून जन्माला येतो"

## रावसाहेब दानवेंची उद्धव ठाकरेंवर बोचरी टीका!

**मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते एकनाथ शिंदे यांच्यासह ४० आमदार आणि १२ खासदारांनी बंडखोरी केल्यानंतर शिवसेना पक्षाला मोठं खिंडार पडलं आहे. बहुसंख्य आमदार आणि खासदार शिंदेगटाकडे असल्याने मूळ शिवसेना कुणाची याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. दरम्यान, बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचे खरे वारसदार नेमके कोण आहेत? यावरून महाराष्ट्रातील राजकीय वातावरण तापत आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाच्या विचारांचे आम्हीच खरे वारसदार असल्याचा दावा शिंदे गटाकडून सातत्याने केला जात आहे.

याच पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री आणि भाजपा नेते रावसाहेब दानवे यांनी उद्धव ठाकरेंवर बोचरी टीका केली आहे. राजाच्या पोटी राजा जन्माला येणं ही पूर्वीचं समीकरण असायचं. पण आता पेटीतून राजा जन्माला येतो. उद्धव



ठाकरे यांनी बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांना तिलांजली दिली, त्यामुळे ते आता राजकीय वारस राहिले नाहीत, अशी टीका दानवे यांनी केली आहे. ते एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलत होते. सध्याच्या राजकीय स्थितीवर भाष्य करताना रावसाहेब दानवे म्हणाले की, "पूर्वीच्या काळी राजा हा पोटातून जन्म घ्यायचा. राजाच्या पोटी जो जन्माला यायचा, तो राजा असायचा. मग तो आंधळा असो... पांगळा असो... बहिरा असो... किंवा मुका असो... तो राजा असायचा. पण आता राजा हा पेटीतून जन्माला येतो. ज्याच्या बाजुने जास्त लोकं असतील, तो राजा. त्यामुळे उद्धव ठाकरे हे बाळासाहेबांचे वारस आहेत, ते बाळासाहेबांच्या संपत्तीचे वारस आहेत. बाळासाहेबांच्या विचारांचेही ते वारस होते.

## शॉर्ट न्यूज

### छेडछाडीस विरोध करताच महिलेला धावत्या रेल्वेतून खाली ढकलले

।नवी दिल्ली।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

हरियाणातील फतेहाबाद-टोहाना येथे एक धक्कादायक घटना समोर आली आहे. येथे रात्री उशिरा एका तरुणाने धावत्या रेल्वेत एका महिलेचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. मात्र संबंधित महिलेने विरोध करताच तिला धावत्या रेल्वेतून ढकलून दिले गेले. रेल्वेतून खाली पडताच या महिलेचा मृत्यू झाला.

विशेष म्हणजे ही घटना घडली तेव्हा महिलेसोबत तिचा नऊ वर्षांचा मुलगा देखील होता. महिलेला रेल्वेतून ढकलल्यानंतर आरोपीने देखील रेल्वेमधून उडी मारली, ज्यामुळे तो गंभीर जखमी झाला. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.सध्या परदेशी पुरा पोलिसांकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरु आहे.मनदीप कौर (३०) असे मृत महिलेचे नाव आहे. असे सांगण्यात आले आहे की, आरोपी तरुण नरवाना येथून रेल्वेत चढला होता आणि महिलेला एकटी पाहून त्याने तिचा विनयभंग करण्यास सुरुवात केली. महिलेने अनेकदा विरोध केला.

# खतरनाक ! अफगाणिस्तान हादरले !

## हेरात मशीद परिसरात बॉम्बस्फोट; 14 जणांचा मृत्यू

हेरात । महाईन्यूज । प्रतिनिधी।

अफगाणिस्तानच्या हेरात प्रांतातील गुजरगाह मशिदीत झालेल्या बॉम्बस्फोटात 14 जण ठार तर 200 जण गंभीर जखमी झाले आहेत. या जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अफगाणिस्तानच्या हेरात प्रांतातील गुजरगाह मशिदीत झालेल्या बॉम्बस्फोटात 14 जण ठार तर 200 जण गंभीर जखमी झाले आहेत. या जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या स्फोटात मशिदीचे इमाम मौलवी मुजीब रहमान अन्सारी यांचा मृत्यू झाला आहे.

एका वृत्तवाहिनीने दिलेल्या माहितीनुसार, स्फोटात गंभीर जखमी झालेल्यांना रक्ताची गरज असून रुग्णालयात सध्या रक्त नाही, असे समजते. डॉक्टरांची संख्या फार कमी आहे. स्फोटानंतरचे काही व्हिडिओ सोशल मीडियावर अपलोड करण्यात आले आहेत. या व्हिडीओत, हेरातमधील गुजरगाह मशिदीत झालेल्या स्फोटानंतर



मोठे नुकसान झाले आहे. या स्फोटात मोठ्या प्रमाणात जीवितहानी अधिक झाली आहे.

हेरातमधील गुजरगाह मशिदीमध्ये झालेल्या स्फोटात इस्लामचे महान विद्वान आणि धार्मिक नेते मानले जाणारे मौलवी मुजीब अन्सारी यांचा मृत्यू झाला. अन्सारी हे तालिबानशी संबंधित प्रमुख धार्मिक नेत्यांपैकी एक होते. मौलवी मुजीब रहमान अन्सारी हे तालिबानचे जवळचे आणि कट्टर धर्मगुरू मानले जात होते.

### काही महिन्यांपासून सातत्यानं होताहेत बॉम्ब स्फोट

अफगाणिस्तानातून अमेरिकेच्या नेतृत्वाखालील सैन्याने माघार घेतल्याचा पहिला वर्धापन दिनही तालिबानने साजरा केला. ज्यामध्ये परदेशी सैनिकांनी सोडलेली लष्करी उपकरणे परेडमध्ये प्रदर्शित करण्यात आली होती. असे असूनही, तालिबान सरकारला आंतरराष्ट्रीय स्तरावर कायदेशीर सरकार म्हणून स्वीकारणाऱ्या देशांची संख्या कमी आहे. अफगाणिस्तानातील बॉम्ब स्फोटांचं सत्र सुरुच आहे. मशिदींमध्ये नमाज पठण करणाऱ्या लोकांवर हल्ले देखील सुरु आहेत. गेल्या काही महिन्यांपासून सातत्यानं बॉम्ब स्फोट करण्यात येत आहेत.

# आपल्यात माणुसकी उरली आहे का?

## बिल्किस बानो प्रकरणाबाबत शबाना आझमी संतप्त

नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

बिल्किस बानो प्रकरणातील ११ आरोपींना गुजरात सरकारने सोडून दिल्याने देशभर संताप व्यक्त केला जातोय. एका असहाय्य महिलेवर बलात्कार करणाऱ्यांना गुजरात सरकारने तुरुगांतून सोडल्याने देशातील कायदेव्यवस्थेबाबत लोकांनी जाब विचारला आहे. असं असतानाच ज्येष्ठ अभिनेत्री शबाना आझमी यांनीही याप्रकरणी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. मला हे सगळं एकून उलटी येतेय, असं त्या म्हणाल्या. तसंच, माणूस म्हणून मला याप्रकरणाची लाज वाटतेय, आपण सगळ्यांनी माणुसकी सोडली का असा सवालही त्यांनी उपस्थित केला. दरम्यान, आपली संतप्त प्रतिक्रिया देताना त्यांच्या डोळ्यातही अश्रू तरळले होते.

माध्यमांशी बोलताना शबाना आझमी म्हणाल्या की, ‘सध्याच्या परिस्थितीमध्ये आपल्या देशात काय घडतंय याचा आपण गांभीर्याने विचार



केला पाहिजे. आपण नेमक्या कोणत्या काळात जगत आहोत याचा प्रश्न मला पडला आहे.लोकांच्या मानसिकतेचा अभ्यास करण्याची गरज आहे. बिल्किस बानो प्रकरणात जे झाले ते संतापजनक होते. आपल्यामध्ये भावनाच राहिल्या नाहीत का.” ‘बिल्किस बानो प्रकरणातील आरोपींना सोडण्यात आले हे खूप भयानक आहे आणि ही परिस्थिती पाहून मला फार वाईट वाटतं. मला तर या सर्व गोष्टींची लाज वाटते. महिलांना सुरक्षा मिळावी यासाठी आपण प्रयत्न करत असतो. पण प्रत्यक्षात काय परिस्थिती आहे हे पाहायला हवे. आजही अनेक गावांमध्ये, शहरांमध्ये हे अत्याचार सुरुच आहेत. ते कशा प्रकारे आपण थांबवणार आहोत? मी जेव्हा या साऱ्या परिस्थितीकडे पाहते मला रडू कोसळते,’ असं शबाना आझमी म्हणाल्या.

# स्वत्व जागवणारा प्रसंग; नौदलाच्या नवीन ध्वजासाठी बावनकुळेंकडून मोदींचे कौतुक

। वर्धा । महाईन्यूज ।
विशेष प्रतिनिधी ।

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भारतीय नौदलात स्वदेशी बनावटीची आयएनएस विक्रांत(INS vikrant) ही युद्धनौका दाखल झाली आहे. या सोबतच पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते भारतीय नौदलाच्या नवीन ध्वजाचेही अनावरण करण्यात आले. भारतीय नौदल आता अखेर ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त झाले आहे. भारतीय नौदलावरची ब्रिटिशांची ओळख आता पूर्णपणे पुसली गेली आहे. कारण भारतीय नौदलाच्या नवीन ध्वजात आता तिरंग्यासोबतच छत्रपती शिवाजी शिवजी महाराजांच्या राजमुद्रेच्या आराकातील नवीन चिन्ह देण्यात आले आहे. नौदलाचा नवा ध्वज छत्रपती श्री शिवाजी महाराजांना अर्पण करण्यात आला आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवातील ही अलौकिक घटना प्रत्येक भारतीयाच्या मनात राष्ट्रतेजाचे स्फुलिंग चेतविणारी आहे.



**स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवातील ही अलौकिक घटना प्रत्येक भारतीयाच्या मनात राष्ट्रतेजाचे स्फुलिंग चेतविणारी आहे. स्वत्व जागवणारा आणि देशाभिमानाचे रोमांच उभे करणारा हा प्रसंग आहे. माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. महाराष्ट्राची मान उंच झाली, शान वाढली. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी कोचीमध्ये नौदलाच्या नव्या ध्वजाचे अनावरण केले**

स्वत्व जागवणारा आणि देशाभिमानाचे रोमांच उभे करणारा हा प्रसंग आहे. माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. महाराष्ट्राची मान उंच झाली, शान वाढली. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी कोचीमध्ये नौदलाच्या नव्या ध्वजाचे अनावरण केले. हा नवा ध्वज भारतीय आरमाराचे जनक छत्रपती श्री शिवाजी महाराजांना समर्पित केला आहे. या नव्या ध्वजामधून ब्रिटीशांच्या सर्व खुणा काढण्यात आल्या. आता या ध्वजावर भारतीय छाप आहे. आजची ही घटना आपल्या गुलामगिरीच्या सर्व खुणा पुसणारी आहे. भारतीयत्वाच्या भावनेने ओतप्रोत हा नवा ध्वज आम्हाला आत्मबल देईन. शिस्तबद्ध लष्कर व सुघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. त्या तेजाला मानाचा मुजरा. अशा शब्दांत भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी भावना व्यक्त केल्या.

# अंदमान-निकोबारमध्ये भूकंपाचे धक्के

## 4.9 रिश्टर स्केलची तीव्रता

कर्नाटक। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

अंदमान आणि निकोबार बेटांवर भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीनुसार, अंदमान आणि निकोबार बेटांच्या 108 किमी उत्तर-पूर्व दिगलीपूर येथे दुपारी 12:43 वाजता 4.9 तीव्रतेचा भूकंप झाला. भूकंपाची खोली जमिनीखाली 10 किमी होती.

पृथ्वी प्रामुख्याने चार थरांनी बनलेली आहे. आतील गाभा, बाह्य गाभा, आवरण आणि कवच. कवच आणि वरच्या आवरणाच्या गाभ्याला लिथोस्फेअर म्हणतात. हा 50 किमी जाडीचा थर टेक्टोनिक प्लेट्स नावाच्या अनेक विभागांमध्ये विभागलेला आहे. या टेक्टोनिक प्लेट्स त्यांच्या जागी कंपन करत राहतात आणि जेव्हा ही प्लेट खूप कंपन करते तेव्हा भूकंप जाणवतो.



### भूकंपाचा केंद्रबिंदू आणि तीव्रता ?

**भूकंपाचा केंद्रबिंदू असे ठिकाण आहे, ज्याच्या खाली प्लेट्सच्या हालचालीमुळे पृथ्वी हलायला लागते. या ठिकाणी किंवा आसपासच्या भागात भूकंपाचा प्रभाव अधिक असतो. जर रिश्टर स्केलवर 7 किंवा त्याहून अधिक तीव्रतेचा भूकंप झाला, तर आजूबाजूच्या 40 किमीच्या त्रिज्येत हा हादरा अधिक तीव्र असतो.**

**पृथ्वी प्रामुख्याने चार थरांनी बनलेली आहे. आतील गाभा, बाह्य गाभा, आवरण आणि कवच. कवच आणि वरच्या आवरणाच्या गाभ्याला लिथोस्फेअर म्हणतात. हा 50 किमी जाडीचा थर टेक्टोनिक प्लेट्स नावाच्या अनेक विभागांमध्ये विभागलेला आहे. या टेक्टोनिक प्लेट्स त्यांच्या जागी कंपन करत राहतात आणि जेव्हा ही प्लेट खूप कंपन करते तेव्हा भूकंप जाणवतो.**



दिल्याचेही दावे सोशल मीडियावर केले जात आहेत. ज्यामुळे त्यांना सोशल मीडियावर ट्रोल केलं जातंय. रणबीर-आलियाने पाकिस्तानातील पूरग्रस्तांना आर्थिक मदत केल्याची बातमी सोशल मीडियावर पसरताच लोकांनी त्यांना ट्रोल करण्यास सुरुवात केली. यामुळे आलिया भट्ट ट्विटरवर ट्रेंड होत आहे. 'आलिया माय फूट' असा हॅशटॅग वापरून

# आलिया- रणबीरने केली पाकिस्तानच्या पूरग्रस्तांना मदत?

आलिया आणि रणबीरने पाकिस्तानातील पूरग्रस्तांसाठी कोट्यवधी रुपयांची देणगी दिल्याचेही दावे सोशल मीडियावर केले जात आहेत. रणबीर कपूर आणि आलिया भट्टचा 'ब्रह्मास्त्र' ९ सप्टेंबरला प्रदर्शित होत आहे. सोशल मीडियावर अनेक लोक चित्रपट आणि कलाकारांवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन करत आहेत. लोकांच्या रागाचे कारण केवळ रणबीर कपूरचे जुने वादग्रस्त व्हिडिओ नाहीत. आता आलिया आणि रणबीरने पाकिस्तानातील पूरग्रस्तांसाठी कोट्यवधी रुपयांची देणगी

ट्रोलर्स तिच्यावर टीका करत आहेत. ट्रोलर्स या दोघांच्या चित्रपटावर बहिष्कार टाकत आहेत. मात्र, आलिया आणि रणबीरबाबत व्हायरल झालेलं हे वृत खोटं आहे आणि सत्य काही वेगळंच आहे. सोशल मीडियावर एक बातमी व्हायरल होत आहे. हे ट्वीट बीबीसी हिंदीच्या नावाने व्हायरल केलं जात आहे. ज्यामध्ये पाकिस्तानमधील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी बॉलिवूड पुढे आले आहे, असे लिहिले आहे. 'ब्रह्मास्त्र' निर्माता करण जोहरने ५ कोटी, आलिया आणि रणबीरने २ कोटी रुपये दान केले आहेत असं म्हटलं गेलंय.

# प्रसिद्ध मराठी अभिनेत्रीने शेअर केला बालपणीचा भांगडा करतानाचा फोटो

गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर अनेक कलाकार त्यांचे जुने फोटो शेअर करताना दिसत आहे. यातील अनेक कलाकार हे शाळेच्या काळातील फोटो शेअर करताना दिसतात. नुकतंच एका प्रसिद्ध मराठी अभिनेत्रीने तिचा एक जुना फोटो शेअर केला आहे. या फोटोत ती भांगडा करताना दिसत आहे. ही अभिनेत्री दुसरी तिसरी कोणी नसून मराठी चित्रपटसृष्टीची 'अप्सरा' अर्थातच अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आहे.


सोनाली ही नेहमीच काही ना काही कारणांमुळे चर्चेत असते. काही महिन्यांपूर्वी तिचा तमाशा लाईव्ह हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात तिच्या भूमिकेचे चांगलेच कौतुक करण्यात आले आहे. नुकतंच सोनाली कुलकर्णीने या चित्रपटासंदर्भात एक पोस्ट



शेअर केली आहे. या पोस्टमध्ये तिने भांगडा करतानाचा फोटो शेअर केला आहे. प्लॅनेट मराठी, माऊली प्रॉडक्शन, एटीएट पिक्चर्स प्रस्तुत याने या चित्रपटाची निर्मिती अक्षय बर्दापूरकर यांनी केली आहे. सौम्या विळेकर, डॉ. मनीषा तोलमारे, समीर केळकर, अजय उपर्वात सहनिर्मित या चित्रपटाची कथा मनीष कदम यांची असून संवाद अरविंद जगताप यांचे आहेत. 'तमाशा लाईव्ह' हा चित्रपट गेल्या १५ जुलै रोजी प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर प्रेक्षकांनी फार कमी प्रतिसाद दिला होता.

# द फेम गेम' सिरीजचा दुसरा सीझन नेटफ्लिक्स प्रदर्शित करणार नाही

यावर्षी फेब्रुवारीमध्ये 'द फेम गेम' ही सिरीज प्रेक्षकांच्या भेटीला आली. या सिरीजला चांगला प्रतिसाद मिळाला. अभिनेत्री माधुरी दीक्षित हिने या वेब सिरीजमधून ओटीटीवर पाऊल टाकले. या सिरीजचा पहिला सीझन सुपरहिट झाला. अनामिका आनंद या अभिनेत्रीच्या आयुष्याभोवती ही सिरीज फिरते. यात अनामिका आनंद ही भूमिका मधुरी दीक्षितने साकारली. पहिला सीझन हिट झाल्यानंतर या सिरीजच्या निर्मात्यांनी आणि नेटफ्लिक्सने या सिरिजच्या दुसऱ्या सीझनची घोषणा केली. परंतु आता नेटफ्लिक्सने 'द फेम गेम'चा दुसरा सीझन त्यांच्या आगामी प्रोजेक्ट्सच्या यादीतून वगळण्याचा निर्णय घेतला आहे. 'बॉलिवूड हंगामा'ने दिलेल्या वृत्तानुसार, 'द फेम गेम 2' या वर्षाच्या अखेरीस प्रदर्शित होणार होती. पण आता नेटफ्लिक्स इंडियाने या सिरीजचा दुसरा सीझन रद्द करत त्यांच्या आगामी प्रोजेक्ट्समधून वगळला आहे. नवनवीन निर्मिती आता ओटीटीकडे वळू लागले आहेत, नवीन उत्तमोत्तम स्क्रिप्ट्स ओटीटीसाठी तयार केल्या जात आहेत त्यांच्या तोडीस तोड 'द फेम गेम 2'ची स्क्रिप्ट नव्हती, म्हणून नेटफ्लिक्सने हा निर्णय घेतला आहे. परंतु हा सीझन नेटफ्लिक्सला का प्रदर्शित करायचा नाही याचे ठोस कारण अद्याप समोर आलेले नाही. ते चांगल्या स्क्रिप्टपासून ते



बजेटपर्यंत काहीही असू शकते असे बोलले जात आहे. द फेम गेम' या सिरीजचा पहिल्या सीझनला चांगला प्रतिसाद मिळाल्याने 'नेटफ्लिक्स'ला याचा दुसरा सीझन प्रदर्शित करायचा होता. आता जर स्क्रिप्टमध्ये बदल करून ती सुधारण्यात आली तर नेटफ्लिक्स पुन्हा एकदा हा दुसरा सीझन प्रदर्शित करण्याचा विचार करेल अशीही माहिती समोर आली आहे.

# ब्रह्मास्त्र २'ची जोरदार चर्चा; 'या' अभिनेत्याने नाकारली मुख्य भूमिका,

९ सप्टेंबर रोजी 'ब्रह्मास्त्र' हा बहुचर्चित चित्रपट प्रदर्शित होणार आहे. अयान मुखर्जी दिग्दर्शित या चित्रपटात आलिया भट, रणबीर कपूर, अमिताभ बच्चन, मौनी रॉय हे कलाकार मुख्य भूमिकेत आहेत. चित्रपटाला बऱ्याच कारणांमुळे विरोध होत आहे. रणबीर आणि आलियाची वक्तव्यं आणि एकंदरच प्रेक्षकांचा असलेला बॉलिवूडवर राग यामुळे 'बॉयकॉट ब्रह्मास्त्र' कायम ट्रेंड होत आहे. हा चित्रपट ३ भागात येणार असून त्याचा पाहिला भाग यावर्षी येणार आहे. अजून पहिला भाग प्रदर्शितदेखील झाला




नसताना याच्या दुसऱ्या भागाबाबत चर्चा सुरू झाली आहे. 'ब्रह्मास्त्र २ – देव' या चित्रपटासाठी हतिक रोशनला विचारण्यात आलं होतं अशी चर्चा बाहेर होत आहे. पण नुकतंच याबद्दल खुलासा झाला आहे. हतिकने हा चित्रपट करण्यास नकार दिला आहे. हतिकवर कामाचा ताण खूप असल्याने त्याने या दुसऱ्या भागासाठी नकार दिला आहे.

# 'द लॉर्ड ऑफ द रिंग्स : द रिंग्स ऑफ पॉवर' सिरीजचा सोशल मीडियावर बोलबाला

'द लॉर्ड ऑफ द रिंग्स : द रिंग्स ऑफ पॉवर' सिरीजचा सोशल मीडियावर बोलबाला, प्रेक्षकांचा मिळतोय तुफान प्रतिसाद

'द लॉर्ड ऑफ द रिंग्स : द रिंग्स ऑफ पॉवर' ही हॉलिवूडची वेब सिरीज शुक्रवारी ओटीटीवर प्रदर्शित झाली आहे. परदेशाप्रमाणेच भारतातदेखील या सिरीजचे अनेक चाहते आहेत. या सिरीजची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत होते. या सिरिजच्या ट्रेलरलाही प्रेक्षकांनी डोक्यावर घेतलं. अखेर प्रेक्षकांची ती प्रतीक्षा संपून अनेकांनी ही वेब सिरीज आतापर्यंत बघितली आहे. सोशल



मीडियावर सध्या या वेब सिरीजचा बोलबाला आहे. शुक्रवारी ॲमेझॉन प्राईम या ओटीटी प्लॅटफॉर्मवरून ही वेब सिरीज प्रेक्षकांच्या भेटीला आली. ती प्रदर्शित झाल्या झाल्या काही तासातच भारतातून शेकडो प्रेक्षकांनी तिचा आस्वाद घेतला. सोशल मीडियावर प्रेक्षक या सिरीजचे भरपूर कौतुक करताना दिसत आहेत.

ट्विटर, इंस्टाग्राम, फेसबुक अशा विविध सोशल नेटवर्किंग साईट्सवर पोस्ट्स शेअर करत प्रेक्षक त्यांना ही वेब सिरीज आवडल्याचे सांगत आहेत.

या वेब सिरीजबद्दल बोलताना एका नेटकऱ्याने लिहिले, "ही मी आतापर्यंत पाहिलेली सर्वोत्तम वेबसिरीज आहे." दुसऱ्याने लिहिले, "उत्कृष्ट व्हिज्युअल इफेक्ट्स, उत्कृष्ट मांडणी..." तर एक नेटकरी म्हणाला, "ही वेब सिरिज अनेक ब्लॉकबस्टर चित्रपटांपेक्षाही वरचढ आहे." अनेकांनी या सिरीजमधील कलाकारांच्या कामाचेही कौतुक केले आहे.

## शॉर्ट न्यूज »

### सुपर ४ सामन्यांपूर्वी भारतीय संघाला मोठा झटका

**आशिया। महाईन्यूज**

आशिया चषकात सुपर ४ च्या सामन्यांपूर्वी भारतीय संघाला मोठा झटका बसला आहे. भारतीय क्रिकेट संघातील अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाला दुखापत झाली असून तो आशिया चषक स्पर्धेतून बाहेर पडला आहे. यासंदर्भात बीसीसीआयने ट्वीट करत माहिती दिली आहे. जडेजाने पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात ३५ धावांची पारी खेळत भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली होती. दरम्यान, रवींद्र जडेजाच्या जागी अक्षर पटेलला भारतीय संघात स्थान देण्यात आला आहे. आशिय चषकासाठी अक्षर पटेलला अतिरिक्त खेळाडून म्हणून स्थान देण्यात आले होते. तो लवकच दुबईसाठी रवाना होणार आहे. आशिया चषकात रवींद्र जडेजा जबरदस्त फॉर्ममध्ये होता. त्याने पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात दोन षटकांत ११ धावा दिल्या ३५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी खेळली होती. त्याने हार्दिक पांड्यासोबत अर्धशतकी भागीदारी करत भारतीय संघाला संकटातून सावरत विजयाच्या उंबरठ्यावर नेऊन पोहोचवले होते.

# भारत-पाकिस्तान पुन्हा आमने-सामने!

## पाकिस्तानचा हाँगकाँगवर 155 धावांनी दणदणीत विजय

**।न्यूयॉर्क । महाईन्यूज ।**

आशिया चषकात आज पाकिस्तान विरुद्ध हॉंगकॉंग यांच्यात शारजाह येथे साखळी फेरीतील शेवटचा सामना खेळवण्यात आला. या सामन्यात पाकिस्तानने हॉंगकॉंगवर १५५ धावांनी दणदणीत विजय मिळवत सुपर ४ मध्ये आपले स्थान निश्चित केले. पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करत हॉंगकॉंगपुढे १९४ धावांचे लक्ष ठेवले होते. मात्र, हॉंगकॉंगला ३८ धावांपर्यंतच मजल मारता आली. दरम्यान, या विजयानंतर सुपर ४ मध्ये भारत-भारत पाकिस्तान पुन्हा आमने-सामने येणार आहे. पाकिस्तानप्रमाणेच हॉंगकॉंगच्या डावाची सुरूवातही खराब राहिली. ३० धावांच्या आतच हॉंगकॉंगचे ५ खेळाडू तंबूत परतले होते. हाँगकाँगच्या निझाकत खानने सर्वाधिक ८ धावा केल्या. तर ऐजाज खान हा सर्वात महागडा खेळाडू ठरला. त्याने ३ षटकात सर्वाधिक ४४ धावा दिल्या. तर एहसान खानने ४ षटकात २८ धावा देत २ बळी घेतले. दरम्यान, हॉंगकॉंगने नाणेफेक जिंकत गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानच्या डावाची सुरूवात खराब राहिली. पाकिस्तानची धावसंख्या १३ वर असताना कर्णधार बाबर आझम स्वस्तात परतला. त्याने ८ चेंडूत १ चौकाराच्या मदतीने ९ धावा काढल्या. त्यानंतर मोहम्मद रिझवान आणि फकर झमन यांनी दुसऱ्या विकेटसाठी ११६ धावांची भागीदारी करत पाकिस्तानचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. मोहम्मद रिझवाने अर्धशतक झळकावत ५७ चेंडूत ७८ धावांची खेळी केली. तर फकर झमनने ४१ चेंडूत ५३ धावा केल्या.



### भारत पाकिस्तान पुन्हा आमने-सामने

पाकिस्तान आणि हॉंगकॉंग या दोन्ही देशांसाठी आजचा सामना 'करो या मरो' या स्थितीत होता. या सामन्यात पाकिस्ताने बाजी मारत हॉंगकॉंगचा १५५ धावांनी पराभव केला. या विजयासह पाकिस्तानने सुपर ४ मध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे सुपर ४ मध्ये भारत-पाकिस्तान पुन्हा एकदा आमने-सामने येणार आहे. रविवारी ४ सप्टेंबर रोजी दोन्ही संघ पुन्हा एकमेकांविरोधात मैदानात उतरलेले पहायला मिळतील.

# अखिल भारतीय फुटबॉल महासंघाच्या अध्यक्षपदी कल्याण चौबे

**। न्यूयॉर्क। महाईन्यूज ।**



### 85 वर्षांच्या इतिहासात प्रथमच घडले...

अखिल भारतीय फुटबॉल महासंघ (एआयएफएफ) ला खेळाडू असलेला अध्यक्ष मिळाला आहे. ८५ वर्षांच्या इतिहासात हे प्रथमच घडले आहे. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत कल्याण चौबे यांनी माजी फुटबॉलपटू बायचुंग भुतिया यांचा पराभव केला. पूर्व बंगालचा माजी गोलरक्षक कल्याण चौबे यांनी ३३ -१ अशा फरकाने विजय नोंदवत भुतिया यांचा पराभव केला. कल्याण चौबे हे भाजपाचे नेते आहेत. गेल्या लोकसभा निवडणुकीत पश्चिम बंगालमधील कृष्णानगर येथून त्यांनी निवडणूक लढवली होती. मात्र, या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. कल्याण चौबे हे भारतीय वरिष्ठ फुटबॉल संघासाठी कधीही खेळले नाहीत. मात्र, काही वेळा ते भारतीय फुटबॉल संघाचा भाग होते. ते मोहन बागान आणि पूर्व बंगाल टीममध्ये गोलरक्षक म्हणून खेळले होते. विशेष म्हणजे भुतिया आणि चौबे हे दोघेही एकेकाळी पूर्व बंगाल संघात खेळाडू होते.

दरम्यान, कर्नाटक फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष आणि काँग्रेसचे आमदार एनए हॅरिस यांची उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. त्यांनी राजस्थान फुटबॉल असोसिएशनच्या मानवेंद्र सिंग यांचा २९-५ अशा फरकाने पराभव केला. तर अरुणाचल प्रदेशच्या किप्पा अजय यांची खजिनदारपदी निवड झाली आहे. त्यांनी आंध्र प्रदेशच्या गोपालकृष्ण कोसाराजूचा ३२-१ अशा फरकाने पराभव केला.

भूतिया यांनी निवडणुकीनंतर प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, ”मी भविष्यातही भारतीय फुटबॉलसाठी काम करत राहीन. तसेच मी कल्याण चौबे यांचेही अभिनंदन करतो. मला आशा आहे की, ते भारतीय फुटबॉलला पुढे घेऊन जातील.” तसेच त्यांनी यावेळी पाठिंबा देणाऱ्या सर्व भारतीय फुटबॉल चाहत्यांचे आभारही मानले.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
96577 67000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही